15th INTERNATIONAL INTERDISCIPLINARY CONFERENCE

# १५वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद

भाग एक



# 'Contribution of Shahu Maharaj, Mahatma Phule and Dr. Babasaheb Ambedkar at National and International Levels'

## 'जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान'

संपादक
डॉ. स्नेहल तावरे
डॉ. शोभा इंगवले

# अनुक्रमणिका


● संपादकीय – डॉ. स्नेहल तावरे /९
डॉ. शोभा इंगवले

१) राजर्षी शाहू महाराज : एक प्रजाहितदक्ष राजा — डॉ. नीला पांढरे /११
२) राजर्षी शाहू महाराजांची विचारधारा — डॉ. स्नेहल तावरे /१५
३) राजर्षी शाहू महाराज : महिला स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते — डॉ. शोभा इंगवले /१९
४) मानवतेचे पुजारी : राजर्षी शाहू महाराज — डॉ. मधुमती कुंजल /२३ मॉरिशस
५) महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील घोंगावणारे वादळ : राजर्षी शाहू महाराज — डॉ. तुकाराम रोंगटे /२७
६) सामाजिक न्यायाचे प्रणेते : राजर्षी शाहू महाराज — डॉ. संजय नगरकर /३१
७) राजर्षी शाहू महाराजांचे आधुनिक कृषी क्षेत्रातील योगदान — डॉ. विलास पाटील /३५
८) शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांचे शैक्षणिक योगदान — डॉ. ज्योती माने /३९
९) राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्योद्धाराचे कार्य — डॉ. निशा मोरे /४३
१०) राजर्षी शाहू महाराज यांचे मुस्लिम समाजाविषयी योगदान — डॉ. एस. जी. अन्सारी/४७
११) शैक्षणिक क्रांतीचे उद्गाते– राजर्षी शाहू महाराज — डॉ. किशोरकुमार गव्हाणे/५१
१२) छत्रपती शाहू महाराज आणि जागतिक दर्जाचे जलसंधारण — डॉ. गणेश मधे /५५
१३) शाहू महाराज – बहुआयामी व्यक्तिमत्त्व — डॉ. नेहा नलावडे /५९

वाचण्यासाठी कसा तळमळीने तन, मन, धनाने झटतो ते पहा.

छत्रपती शाहू राजे आपल्या विकास कामांना गती देत असतानाच अचानक संस्थानावर दोन नैसर्गिक आपत्ती ओढावल्या. प्रशासनाची गाडी रुळावर येऊन नुकतीच कुठे वेग घ्यायला लागली होती. तेवढ्यात सन १८९६ ला संस्थानात मोठा दुष्काळ पडला. त्याचवेळी कोल्हापूर शहरात आणि आजूबाजूच्या भागात प्लेगच्या साथीचीही लागण झाली. या दोन्ही आपत्तींना तोंड देतादेता अननुभवी, अगदीच तरुण असलेल्या महाराजांची खूपच दमछाक होऊ लागली. पण प्रभावी प्रशासन, कार्यक्षम अधिकारी आणि अनुभवी योग्य सल्लागार यांच्या साहाय्याने त्यांनी या दोन्ही आपत्तींना यशस्वीपणे तोंड दिले. संकटकाळात राजा कसा असावा आणि त्याने जनतेला कशी मदत करावी याचा एक आदर्शच शाहू महाराजांनी घालून दिला आहे. दुष्काळात प्रशासनाने जनतेसाठी जे जे करायला हवे ते ते त्यांनी केले. या काळात संस्थानचा खजिना त्यांनी लोकांसाठी वापरला. प्रथम त्यांनी तातडीचे अल्पकालीन उपाय योजले आणि लगेचच कायम स्वरूपी दीर्घकालीन योजनाही आखायला सुरूवात केली. दोन्ही उपाय त्यांनी ताबडतोब अंमलात आणायला सुरूवात केली.

पावसाने १८९६ पासूनच पूर्ण दडी मारली. आकाशातलं पाणी जसं पळाले तसे जमिनीवरचे आणि जमिनीखालचे पाणीसुद्धा अदृश्य होवून लागले. काळीमाय पार भेगाळून गेली. डोंगर उघडेबोडके आणि वाळलेल्या गवतामुळे पिवळे धमक दिसू लागले. पेरलेल्या बियाण्यांवर पक्षी गुजराण करू लागले. जस जसा वेळ जावू लागला तशी तशी परिस्थिती आणखीनच बिकट बनत चालली. शेतकऱ्यांच्या घरातल्या कणग्या पार मोकळ्या होऊन गेल्या. हातांना काम उरले नाही. दररोजच्या जेवणाची भ्रांत पडू लागली. लोक कामाच्या शोधात गावोगावी भटकू लागले. काहींनी तर गावाला रामराम केला आणि शहराचा रस्ता धरला. जशा दुष्काळाच्या बातम्या संस्थानातून शाहू महाराजांपर्यंत पोचू लागल्या तसे ते अस्वस्थ झाले.

धान्य बाहेरून आणले, पण ते घेण्याची कुवत लोकांच्यात असावयास हवी. ती खिशात पैसे असल्याशिवाय कशी येणार ? त्यासाठी लोकांच्या हातांना काम देण्याची गरज होती. धान्य पुरवले पण पाण्याचे काय ? ते कसे आणणार ? त्याकाळात आजच्या सारखे टँकर नव्हते. रस्त्यांचे जाळे नव्हते. त्यामुळे गावोगावी लोकांना पिण्याचे पाणी पुरवणे अवघड काम होते. त्याचबरोबर लोकांना काम देणे, रोजगार उपलब्ध करून देणे ही पण समस्या होतीच. छत्रपती शाहू महाराजांनी या दोन्हीची सांगड घालण्याचा सुंदर आणि खूप दूरवर परिणाम करणारा उपाय शोधून काढला. त्यांनी लोकांना त्यांच्या जुन्या विहिरीतील गाळ उपसणे, विहिरी खोल करणे, त्या रुंद करणे अशा कामात गुंतवून टाकले. जुने बंद पडलेले झरे, काही ठिकाणी गाळ काढल्याने मोकळे झाले. विहिरींना पाणी आले. काही ठिकाणी खोली व रुंदी वाढल्याने विहिरींची पाणी साठवणक्षमता वाढली. ज्यांना

विहिरी काढावयाच्या होत्या आणि जे त्यासाठी श्रमदान करण्यास तयार होते, त्यांना संस्थानाकडून काही रक्कम देऊन, अशा नवीन विहिरी काढण्यास प्रोत्साहन दिले. यामुळे थोडाफार पाण्याचा प्रश्न सुटला. पण यातून छत्रपतींनी मात्र एक चांगला धडा घेतला. या कामांनी तात्पुरता प्रश्न सुटला तरी भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी काही ठोस काम करण्याची आवश्यकता असल्याचे मनोमन जाणले. त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू झाले.

दुष्काळी कामामध्ये तात्पुरत्या कामाबरोबरच काही कायम उपयोगाची कामेही घेण्यात येऊ लागली. त्यात विहिरी खोदण्याबरोबरच नदी नाल्यांना बांध बांधणे, तलाव बांधणे, जुन्या तलावातील गाळ काढणे, वाहतुकीसाठी रस्ते बांधणे, नदी नाल्यावर पूल बांधणे अशी कामे घेण्यात येऊ लागली. संस्थानात हजारो तलाव बांधण्याचे नियोजन करण्यात आले. संस्थानात पैसा आणि स्थानिक लोकांचे श्रमदान यातून ही कामे करण्यात येऊ लागली. त्याचबरोबर जुन्या तलावातील गाळ उपसून त्यांची पाणी साठवणक्षमता वाढवण्यात आली. विशेष म्हणजे यातील अनेक तलाव हे सिंचन तलाव असून त्यावर हजारो एकर जमीन ओलिताखाली आणण्यात आली. आजही हे तलाव हे सिंचनाचे काम इमानेइतबारे करताना दिसत आहेत. या तलावांमुळे आणि बंधाऱ्यामुळे गावातील जनावरांचा पाण्याचा प्रश्न सुटला. आपण पाण्याची सोय नेहमी आपल्या दृष्टीनेच करण्याचा विचार करतो. इतर प्राण्यांचा – पक्ष्यांचा विचार आपण क्वचितच करतो.

दुष्काळ निवारणासाठी संस्थानच्या प्रशासनात स्वतंत्र कचेरी उघडणारे कदाचित छत्रपती शाहू महाराज एकमेव संस्थानिक असावेत. त्यांनी हुजूर कार्यालयातच 'दुष्काळ निवारण विभाग' सुरू केला आणि त्याचे अधिकार म्हणून संस्थानाच्या दिवाणांचीच नेमणूक केली. निव्वळ कोल्हापुरातच कचेरी काढून ते थांबले नाहीत तर त्यांनी सर्व संबंधित मामलेदार कचेऱ्यांतसुद्धा खास दुष्काळ निवारण विभाग सुरू केला. त्या विभागामार्फत लोकांना दुष्काळ निवारणासाठी लागणारी उपकरणे, हत्यारे, अवजारे आणि इतर साधने पुरवली जात. या साहित्याच्या खरेदीवर एका वर्षात त्यावेळी २६,००० रुपयांहून अधिक खर्च करण्यात आला होता. साधने किंवा उपकरणे नाहीत म्हणून लोकांना शेतीची, विहिरींची किंवा रस्त्याची कामे करताना अडचण येऊ नये, याची पूर्ण खबरदारी घेतली जात असे हे यावरून दिसून येते. या सर्व विवेचनावरून हेच लक्षात येते की, छत्रपती शाहू महाराजांनी दुष्काळ निवारणासाठी कराव्या लागणाऱ्या सर्वच बाबींचा सखोल विचार केला होता. छत्रपती शाहू महाराज केवळ दुष्काळ निवारणाचे काम करून थांबले नाहीत. त्यांनी दीर्घकालीन दुष्काळ निवारण योजना राबवण्याचे नियोजन करावयास सुरूवात केली.

दुष्काळाला हटविण्यासाठी आधुनिक शेती करणे आवश्यकच आहे. पण आधुनिक शेती करायची असेल तर तिला खात्रीशीर पाणी मिळेल याची व्यवस्था

'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस' हे वसतिगृह सुरू केले.'' प्रत्येक जातीच्या कार्यकर्त्यांना हाताशी धरून त्यांनी त्यांच्याकडून वसतिगृहे काढली. त्यासाठी त्यांना मोफत जमिनी, इमारत बांधण्यासाठी पैसे दिले. मराठे, जैन, लिंगायत, अस्पृश्यजन, सारस्वत, दैवज्ञ, शिंपी, मुसलमान, वंजारी यांची वसतिगृहे सुरू होताच कोल्हापूर नगरी विद्यार्थी-वसतिगृहाची जननी बनली.

**६. उच्च व व्यवसाय शिक्षणास चालना**

प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच शाहू महाराजांनी उच्च व व्यवसाय शिक्षणालाही महत्त्व दिले. राजर्षी शाहू महाराज म्हणतात, ''प्राथमिक शिक्षणावर माझा भर आहे तरी दुय्यम व उच्च शिक्षणाकडे माझे लक्ष कमी नाही. माझ्या रयतेमध्ये प्राथमिक व उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याची माझी जोराने खटपट चालली आहे.'' बहुजन समाजातील मुलांच्या उच्च शिक्षणाची महाराजांनी सोय केली. उच्च शिक्षणासाठी त्यांनी काही विद्यार्थ्यांना परदेशात पाठविले. जेणेकरून तेथे जाऊन त्यांनी उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना देणग्या व शिष्यवृत्त्या (डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पी. सी. पाटील) दिल्या. शाहू महाराजांनी व्यावसायिक शिक्षणाचादेखील पाया आपल्या संस्थानात घातला. इ.स. १९०३ मध्ये महाराजांनी कोल्हापुरात 'ओब्रायन टेक्निकल स्कूल' ची स्थापना केली. तेथे वेगवेगळ्या उद्योगांसाठी त्यांनी शिक्षणाची व्यवस्था केली. व्यावसायिक शिक्षण सर्वांना मिळाले तरच समाजाची आर्थिक प्रगती होईल असे त्यांचे मत होते. खेडेगावचा कारभार चालविला जाण्यासाठी 'पाटील शाळा' व 'तलाठी शाळा' सुरू करून पाटील व तलाठ्यांना जमाखर्च, कायदे, शांतता, सुव्यवस्था व महसुलाविषयक शिक्षण दिले जाई. तांत्रिक शिक्षणासाठी 'जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्युटची' स्थापना करून येथून सुतारकाम, गवंडीकाम व लोहारकाम इत्यादी विषयांचे शिक्षण देण्यास सुरूवात केली. तसेच सैनिकी शिक्षण देणारे 'इन्फंट्री स्कूल' ची स्थापनाही महाराजांनी केली.

**संदर्भ सूची –**


१. भ.बा.जाधव (संपा.)- राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, पहिली आवृत्ती, कोल्हापूर, १९७१, पृ.क्र.२-३

२. डॉ. गव्हाणे, शिंदे, कुलकर्णी (देशमुख)- आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती, २ ऑक्टो. १९९४, पृ. क्र.३२५

३. गायकवाड प्रदीप- राजर्षी शाहू महाराजांची निवडक भाषणे, क्षितिज प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २००२, पृ.क्र.२१

४. मोरे दिनेश – आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के.एस.प्रकाशन, पुणे २००६ पृ.क्र.३०९

५. जाधव – मेट्टा- लोकराज्य शाहू छत्रपती, शैलेंद्र प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१० पृ.क्र.२८.




## छत्रपती शाहू महाराज आणि जागतिक दर्जाचे जलसंधारण


**डॉ. गणेश काशिनाथ मधे**

**भ्रमणभाष : ९६६५५३३४३५**


भारतातील प्राकृतिक रचनेचा परिणाम म्हणून भौगोलिक विविधता खूप कमालीची आढळते. त्यामुळे भारतात हवामानाचा लहरीपणा ही अत्यंत नियमित घडणारी घटना आहे. आपल्या देशातील मान्सून कधी शहाण्यासारखा वागेल, तर कधी लहरी महंमद त्याच्यात शिरेल, सांगता येत नाही. म्हणूनच मान्सूनला पर्यावरणातील जुगार असेही संबोधतात. देशही इतका मोठा आणि भौगोलिक दृष्ट्या वैविध्याने नटलेला आहे की त्याच्या कुठल्या भागातील मान्सून केव्हा कसा वागेल हे सांगणे कठीण आहे. तरीसुद्धा गेल्या दोनशे वर्षांची मान्सूनची माहिती मिळवली तर असेच दिसेल की देशात दर १० – १२ वर्षांनी एकदा अतिवृष्टी आणि पुढील १० – १२ वर्षांनी अवर्षण काळ ठरलेला. मान्सूनचा आलेख कधी सरळ रेषेत नसतोच. तो नेहमीच – उंच आणि खाली अशा लहरीसारखा असतो. त्यामुळे या नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्याची तयारी आपल्याला करता येवू शकते. पण असे असले तरीही आपल्या देशात असलेली प्रशासकीय उदासीनता यामुळे आपले नेहमी माकडासारखे. पावसाळा आला की घर बांधण्याचा संकल्प आणि पावसाळा संपला की पुन्हा पूर्वीसारखे सुरू.

सन १८९६ – ९९ या काळात जेव्हा संपूर्ण भारतात दुष्काळ पडला होता, तेव्हा त्या दुष्काळात संपूर्ण भारतात १०,००,००० लोक मृत्युमुखी पडले होते. पण त्यात कोल्हापूर संस्थानातील एकही व्यक्ती नव्हती. कोल्हापूर संस्थान निव्वळ एकमेव असे होते की त्या दुष्काळावर मात करण्यात तेथील राज प्रशासनाला यश आले होते. असे काय त्यांनी केले की त्यांनी एवढ्या मोठ्या नैसर्गिक आपत्तीवर मात करता आली ? असे काय छत्रपती शाहू महाराजांनी केले आहे? कोल्हापुरात असा कितीसा दुष्काळाचा परिणाम असणार आहे ? कारण माझे हे मत कोल्हापुरचे आजचे रूप पाहून तयार झालेले होते. पण जेव्हा मी या विषयावरील संदर्भ साहित्य वाचायला लागलो तेव्हा मला कळाले की, एक नुकतेच मिसरूड फुटायला लागलेला २०-२१ वर्षांचा तरुण, छत्रपती घरण्याच्या गादीवर बसतो काय आणि आपल्या या लहान वयातच अद्वितीय, भव्यदिव्य आणि पुढील अनेक पिढ्यांना फलदायी ठरणारे काम करतो काय ! सगळचं कसं स्वप्नवत वाटते. पण ते सत्य आहे. तुम्ही हा लेख वाचा आणि एक राजा आपल्या प्रिय प्रजेला निसर्ग कोपापासून

करणे अत्यंत आवश्यक आहे. हेही शाहू महाराजांनी ओळखले होते. म्हणूनच विहिरी, तलाव यांच्याबरोबरच त्यांनी नदीनाल्यांवर बांध आणि धरण बांधण्यास सुरूवात केली. विहिरीसाठी शेतकऱ्यांना कर्जे देऊ केली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ब्रिटिश सरकारकडून त्यांनी भोगावती नदीवर फेजिवडे येथे 'राधानगरी धरणाची योजना' मंजूर करून घेतली आणि आपल्याच देखरेखीखाली १९०७ ला त्याची पायाभरणीही केली. १९१७ पर्यंत निम्मे धरण पूर्ण करून घेतले. पण पहिल्याच महायुद्धामुळे काम थांबवावे लागले. त्यानंतर ते काम छत्रपती शाहू महाराजांचे चिरंजीव छत्रपती राजाराम महाराज यांचे कारकिर्दीत पूर्ण झाले. आज या धरणामुळेच अनेक ॲग्रो इंडस्ट्रीज कोल्हापूर जिल्ह्यात उभ्या असून या जिल्ह्याला दरडोई उत्पन्नामध्ये देशात अगदी वरच्या स्थानावर विराजमान होण्याचा मान मिळवून दिला आहे. या सर्व विवेचनावरून आपल्या लक्षात आलेच असेल की दुष्काळ निवारणाबरोबरच छत्रपती शाहू महाराजांनी पहिल्या 'हरित क्रांती'चा पाया घातला. म्हणून त्यांना 'हरित क्रांतीचे आद्यजनक' ही मानण्यात येते. या धरणाचा अभ्यास करण्यासाठी परदेशातून अनेक संशोधन करणऱ्या व्यक्ती राधानगरी धरणाला भेट देतात. तसेच महाराष्ट्रातही 'कोल्हापूर पद्धतीचा बंधारा' (के.टी.वेअर) जलसंधारणाच्या कामात लोकप्रिय आहे.

या कायमस्वरूपी योजना छत्रपती शाहू महाराजांनी केल्यामुळे आजचा कोल्हापूरचा शेतकरी सधन आहे आणि दुष्काळास तोंड देण्यास सक्षम आहे. असा आदर्श जर आजच्या राज्यकर्त्यांनी घेतला तर आपल्या देशातील दुष्काळी परिस्थितीवर केव्हाही मात करू शकतो हे आपल्या लक्षात येते. तेव्हा या त्यांच्या कामापासून आज आपण ही चांगला धडा घ्यावा यातच आपले हित आहे.

### संदर्भ सूची –


१. शाहूंच्या आठवणी– प्रा. नानासाहेब साळुंके
२. छत्रपती राजर्षी शाहू महाराज – तु. बा. नाईक
३. जलोपासना, दिवाळी विशेषांक २०१४ – डॉ. अनिलराज जगदाळे




## शाहू महाराज : बहुआयामी व्यक्तिमत्त्व


डॉ. नेहा देविदास नलावडे
भ्रमणभाष : ९४२२३१४९९१


विसाव्या शतकातल्या प्रारंभी महाराष्ट्राचा जो राजकीय व सामाजिक इतिहास पडला त्यात राजर्षी शाहू महाराजांचे स्थान महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील बहुजन समाजाला या युगात पूज्य झालेल्या तीनच व्यक्ती सांगता येतील. पहिले जोतीराव फुले, दुसरे शाहू महाराज व तिसरे बाबासाहेब आंबेडकर, राजकारणात ज्याप्रमाणे जहाल व नेमस्त असे भाग महाराष्ट्रात ब्रिटिश अमदानीत पडले. तसेच समाजसुधारणेतही पडले. समाजसुधारणेच्या क्षेत्रात जहाल चळवळीचे पहिले प्रवर्तक जोतीराव फुले झाले. त्या चळवळीची जोतीराव फुल्यांच्या निधनानंतर काहीशी पीछेहाट झाली त्या चळवळीत पुन्हा नवा जोश शाहू महाराजांनी व त्यांचे सहकारी भास्करराव जाधव यांनी आणला. ही चळवळ कोल्हापूर केंद्रातून मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व प्रांतांत विस्तार पावली. जोतीराव फुले व शाहू महाराज यांच्या परंपरेतील नंतरचे सर्वात मोठे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. शाहू महाराजांच्या विचारात मध्ययुगीन विचारांचा लवलेश नव्हता. मानवी स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर समाजाची पुर्नरचना झाली पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. आधुनिक विचारांच्या अनुरोधाने समाज बदला पाहिजे. जुने विचार, जुन्या रूढी परंपरेचा त्याग करून मानसिक गुलामगिरीतून मानवाची मुक्तता झाली पाहिजे यासाठी त्यांनी आपली सत्ता व सामर्थ्य राबविले. हे क्रांतिकार्य करीत असताना प्रतिगामी प्रवृत्तीच्या सनातन्यांच्या विरोधांशी त्यांना संघर्ष करावा लागला. आर्थिक व मानसिक शोषणावर आधारलेली विषम समाजपद्धती बदलण्यासाठी एका संस्थानिकाने शोषितांना जागृत करून त्यांचे नेतृत्व केले. हा एक मोठा चमत्कार समजावा लागेल.

### १) शैक्षणिक चळवळ –

सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण आपल्या राज्यात देण्याची योजना त्यांनी अंमलात आणली. बडोदा, म्हैसूर, त्रावणकोर व कोल्हापूर ही त्यावेळची संस्थानी राज्ये शिक्षणाच्या बाबतीत ब्रिटिश भागापेक्षा जास्त पुढे गेली व आघाडीवर राहिली. माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण याबाबतीत कोल्हापूर एक महत्त्वाचे केंद्र बनले. सत्यशोधक समाज व आर्य समाज यांची चळवळ एकरूप करण्याचा शाहू महाराजांनी प्रयत्न केला. शैक्षणिक कार्याची वाढ होण्याकरिता त्यांनी त्यांचा उपयोग करून घेतला. सर्व जातींची व सर्व धर्मांची विद्यार्थी वसतिगृहे काढण्याच्या यशस्वी